Jagdamba Education Society's
# Santosh N. Darade Polytechnic
At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401

Accredited by
NATIONAL BOARD OF ACCREDITATION

## * Central Library *

Please Consider the Environment Before Printing…

**Date: 14/06/2025**

# Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

आपल्या वाचन्या, आपल्या वाचन्या...
आपलं महानगर | My महानगर.com
www.mymahanagar.com

## दिनविशेष

### कादंबरीकार, इतिहासकार मनोहर माळगावकर



मनोहर माळगावकर हे भारतीय साहित्यातील प्रसिद्ध इंग्रजी साहित्यिक, कादंबरीकार आणि इतिहासकार होते. त्यांचा जन्म १२ जुलै १९१३ रोजी बेळगाव जिल्ह्यातील जगबेट गावात झाला. त्यांचे आजोबा देवास संस्थानचे राज्यपाल होते. त्यांनी बेळगावमध्येच प्राथमिक शिक्षण घेतले. नंतर धारवाड, मुंबई येथून पुढील उच्च शिक्षण प्राप्त केले. सैन्यात दाखल होऊन मराठा लाईट इन्फंट्रीमध्ये लेफ्टनंट कर्नलच्या पदावर त्यांनी कार्य केले. वयाच्या ३९ व्या वर्षी त्यांनी सेवेतून निवृत्ती घेतली. माळगावकरांचे व्यक्तिमत्त्व आणि लेखन अष्टपैलू होते.

दि स्टेट्समन आणि डेक्कन हेराल्ड या इंग्रजी वृत्तपत्रांमुळे त्यांनी विविध विषयांवर स्तंभलेखन केले. स्तंभलेखक म्हणून त्यांना विशेष लोकप्रियता मिळाली. कथा, कादंबऱ्या, चरित्रे व ललित लेखन, वृत्तपत्र स्तंभलेखन त्यांनी मोठ्या प्रमाणात केले. परंतु त्यांची ओळख वाचकांना 'प्रिन्सेस' या कादंबरीमुळे झाली. त्यानंतर त्यांची ए बेंड द गँगेस आणि मेन हू किल्ड गांधी ही दोन पुस्तके देशात आणि परदेशात गाजली. सूड आणि क्रौर्य यांचे रोमांचकारी दर्शन घडवणारी डिस्टंट ड्रम ही माळगावकरांची पहिली कादंबरी १९६० मध्ये प्रसिद्ध झाली. माळगावकरांना भारतीय इतिहासाचे खूप आकर्षण होते. त्यांनी कान्होजी आंग्रे द सी हॉक मराठा अॅडमिरल, पुअर्स ऑफ देवास, सिनियर आणि छत्रपतीज ऑफ कोल्हापूर हे इतिहास ग्रंथ लिहिले. द मेनू हू किल्ड गांधी हे त्यांचे गाजलेले पुस्तक म्हणजे भारताची फाळणी, स्वातंत्र्य आणि गांधीजींचा खून याचा पुनर्प्रत्यय आहे. वेधक कथावस्तूची निवड, कथनाचे कौशल्य, नाट्यमय प्रसंगांची विखुरणी ही माळगावकरांच्या कथा-कादंबऱ्यांची लक्षणीय वैशिष्ट्ये आहेत. त्यांच्या साहित्य योगदानाबाबत त्यांना अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. अशा या अष्टपैलू लेखकाचे १४ जून २०१० रोजी निधन झाले.

Nashik Edition
Jun 14, 2025 Page No. 4
Powered by: erelego.com

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

सकाळ

# शिक्षण घेतानाच २२८ विद्यार्थ्यांना नोकरी

## बाभूळगावच्या एसएनडी पॉलिटेक्निकमध्ये प्लेसमेंटमधून नामांकित कंपन्यांमध्ये निवड

■ **सकाळ वृत्तसेवा**

येवला, ता. ९ : शिक्षण घेताना शेवटच्या वर्षातच नोकरी लागली तर होणारा आनंद गगनापार असतो. बाभूळगाव येथील जगदंबा एज्युकेशन संस्थेच्या एसएनडी पॉलिटेक्निकमध्ये वर्षभरात तब्बल २२८ विद्यार्थ्यांना शिकत असतानाच नोकरीची संधी मिळाली आहे.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये एसएनडी पॉलिटेक्निक येथे आयोजित पूल कॅम्पसमध्ये या विद्यार्थ्यांची विवीध नामांकित कंपन्यांमध्ये निवड झाली आहे. संस्थेने आणखी एक यशाचे शिखर गाठले आहे. विद्यार्थांना औद्योगिक क्षेत्राची माहिती व्हावी यासाठी तज्ज्ञांचे व्याख्यान व विविध कंपन्यांना भेटी देऊन तेथे होत असलेल्या कामाची रूपरेषा कशी असते याविषयी मार्गदर्शन आयोजित केले जाते. पुणे येथील टाटा मोटर्स मध्ये ५० विद्यार्थ्यांची निवड झाली. नाशिक येथील बॉश कंपनीमध्ये मेकॅनिकल अभियांत्रिकीचे १७ विद्यार्थी तर इलेक्ट्रिकल अभियांत्रिकीचे १८, मुंबई येथील भारत गिअर कंपनीमध्ये मेकॅनिकलच्या ३५ विद्यार्थांची, अहिल्यानगर येथील माय इंडिया कंपनीत मेकॅनिकलचे १८ विद्यार्थी तर इलेक्ट्रिकलचे २२ विद्यार्थ्यांची निवड झाली. संभाजीनगर येथील बजाज ऑटो कंपनीमध्ये मेकॅनिकलच्या २८ विद्यार्थी तर इलेक्ट्रिकलच्या २५ विध्यार्थांची निवड झाली. नाशिक येथील स्कायवे ग्रुपमध्ये सिव्हील इंजिनिअरिंगच्या १५ विद्यार्थ्यांची निवड झाली. विविध कंपन्यांमध्ये निवड झालेल्या विध्यार्थांना प्रतिवर्ष सरासरी ३-४ लाख रुपये पगार व कंपनीच्या विविध सुविधा मिळणार असल्याची माहिती प्राचार्य उत्तम जाधव यांनी दिली. संस्थेचे कार्यकारी संचालक रुपेश दराडे, प्राचार्य जाधव यांच्यासह विभागप्रमुख संदीप असुदे, गणेश चव्हाण, शोराब शेख, रविकुमार ताकसांडे, विजय गंडोळे, प्रवीण लहरे, संतोष माकुने आदींनी विध्यार्थांचे अभिनंदन केले.



**बाभूळगाव** : कॅम्पस प्लेसमेंटमधून नोकरीसाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांसोबत महाविद्यालयाचे प्राध्यापक.

> एसएनडी कॅम्पसमध्ये उपलब्ध अत्याधुनिक सुविधेमुळे तसेच विद्यार्थ्यांना शिकत असतानाच कॅम्पस मुलाखती व कंपन्यांसंदर्भात ज्ञान व माहिती देण्याचा प्रयत्न होतो. त्याचे फलित म्हणजे अधिकाधिक विद्यार्थ्यांना शिकत असतानाच नोकरी मिळत आहे याचा संस्थेला अभिमान वाटतो.
>
> - **रूपेश दराडे**, संचालक, मातोश्री शिक्षण संस्था, येवला.

Nashik, District-Today
10/06/2025 Page No. 3